सहायक मोटार वाहन निरिक्षक यांना शासन सेवेत सामावून घेणेबाबत.

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन निर्णय क्रमांकः याचिका -०९१६/प्र.क्र.२०१/परि-३

२ रा मजला, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग,मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: २२ एप्रिल, २०१९.

<u>संदर्भ</u> -१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने दि. २९/०३/२०१४ रोजी प्रसिध्द केलेली शिफारस यादी.

२) मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाचे मुळ अर्ज क्र.२८९/२०१५ व ६२०/२०१५ मधील दि.२४/११/२०१५ चे आदेश.

३) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने दि. २६/०२/२०१६ रोजी प्रसिध्द केलेली सुधारित शिफारस यादी.

४) मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाचे पुर्नविलोकन अर्ज क्र.८/२०१६, ११/२०१६ व २२/२०१६ मधील दि.१८ /११/२०१६ चे आदेश.

५) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे पत्र क्र.१०१९/२०१३/१४-ब दि.९/२/२०१७, दि.२७/४/२०१७ व दि.२३/१०/२०१७ चे पत्र.

६) वरीष्ठ सचिव समितीचे दि.३१/८/२०१८ च्या बैठकीचे इतिवृत्त.

७)मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांनी रिट याचिका क्र.८२७५/२०१८ मध्ये दि.२३/७/२०१८ रोजी दिलेले निर्देश.

<u>प्रस्तावना :-</u>

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने सहायक मोटार वाहन निरिक्षक परिक्षा-२०१३ च्या अनुषंगाने २१५ उमेदवारांची निवडयादी दि.२९/३/२०१४ रोजी प्रसिध्दी केली होती. तथापि, सदर निवडयादी तयार करताना लोकसेवा आयोगाने समांतर आरक्षणाची विहित कार्यपध्दती अवलंबलेली नसल्याने, मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे मुळ अर्ज क्र.२८९/२०१५ व ६२०/२०१५ दाखल करण्यात आले होते. सदर मूळ अर्जामध्ये मा. प्रशासकीय न्यायाधिकरणाने संदर्भ क्र.२ येथे दिलेल्या आदेशानुसार लोकसेवा आयोगाने दि.२६.०२.२०१६ रोजी सुधारित निवड यादी जाहीर प्रसिध्द केली. परंतु सुधारित निवड यादीत दि.२९.०३.२०१४ रोजी प्रसिध्द झालेल्या व त्याअनुषंगाने सेवेत असलेल्या काही उमेदवारांचा समावेश नसल्याने त्या उमेदवारांनी मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे मुळ अर्ज क्र.२८९/२०१५ व ६२०/२०१५ मध्ये पुर्नविलोकन अर्ज क्र.८/२०१६ व ११/२०१६ दाखल केले. सदर पुर्नविलोकन अर्जामध्ये मा. न्यायाधिकरणांने संदर्भाधिन क्र.४ येथील आदेशान्वये या उमेदवारांना संबंधित प्रवर्गात भविष्यात रिक्त होणाऱ्या पदांवर उभ्या व समांतर आरक्षणानुसार सामावून घेण्याबाबत विचार करावा असे आदेश दिले आहेत. मा. प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या उक्त आदेशावर महाराष्ट्र लोकसेवा आयोगानेही संदर्भीय क्र.५ येथील पत्रांन्वये मा. न्यायाधिकरणाचे आदेश स्पष्ट असून, त्यात सविस्तर कारणमिमांसा नमूद केलेली असून त्यानुसार शासनाने कार्यवाही करणे

अपेक्षित असल्याचे अभिप्राय दिलेले आहेत. या सर्व पार्श्वभूमीवर या उमेदवारांना शासन सेवेत सामावून घेण्याबाबतचा प्रस्ताव मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील वरिष्ठ सचिव समिती समोर सादर करण्यात आला होता. त्यानुसार वरिष्ठ सचिव समितीने सहायक मोटार वाहन निरिक्षक या संवर्गातील रिक्त असलेल्या पदांवर मागासवर्गीय आरक्षण, समांतर आरक्षणाची पदे विचारात घेऊन संबंधीत उमेदवारांच्या वर्गवारीनुसार असणाऱ्या रिक्त पदांवर समावेश करण्यास व सदरहू उमेदवारांच्या समावेशनाच्या संदर्भातील आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून त्यांच्या जेष्ठता निश्चित करण्यास विशेष बाब म्हणून दिलेली मान्यता दिलेली आहे.

दरम्यानच्या काळात या ९ उमेदवारांपैकी श्री. संदिप मोरे व इतर यांनी मा. मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे रिट याचिका क्र.८२७५/२०१८ दाखल केली आहे. त्यामध्ये मा. उच्च न्यायालयाने दि.२३.०७.२०१८ रोजी याचिकाकर्त्यांच्या प्रस्तावावर ६ महिन्याच्या आत गुणवत्तेवर निर्णय घेण्याचे निर्देश दिलेले आहेत.

वरील पार्श्वभूमीवर खालील विवरणपत्रातील उमेदवारांना शासन सेवेत समावून घेण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यावर शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

शासन निर्णय :-

मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने मूळ अर्ज क्र.२८९/२०१५ व ६२०/२०१५ मधील पुनर्विलोकन अर्ज क्र.८/२०१६, ११/२०१६ व २२/२०१६ मध्ये दि.१८.११.२०१६ रोजी दिलेला न्यायनिर्णय, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अभिप्राय, वरिष्ठ सचिव समितीचा निर्णय व मा. उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र.८२७५/२०१८ मध्ये दिलेले निर्देश विचारात घेऊन खालील विवरणपत्रातील ९ उमेदवारांना सहायक मोटार वाहन निरिक्षक (गट-क) या संवर्गातील रिक्त असलेल्या पदांवर मागासवर्गीय आरक्षण व समांतर आरक्षणाची पदे विचारात घेऊन, त्यांच्या वर्गवारीनुसार शासन सेवेत समावून घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	उमेदवारांचे नाव	मूळ प्रवर्ग	ज्या प्रवर्गातून लोकसेवा आयोगाने शिफारस केलेली होती तो प्रवर्ग
१.	श्री. अजय शंकर थोरात	अ.जा.	अ.जा.(माजीसैनिक)
२.	श्री. हेमंत प्रल्हाद जयकर	अ.जा.	अ.जा.(माजीसैनिक)
३.	श्री. संदिप जनार्धन मोरे	अ.जा.	अ.जा.(माजी सैनिक)
४.	श्रीमती प्रज्ञा रमेश अभंग	इ.मा.व. (महिला)	खुला (महिला)
५.	श्रीमती कल्याणी सुरेश मंडलिक	इ.मा.व. (महिला)	खुला (महिला)
६.	श्रीमती भाग्यश्री भगवान पाटील	इ.मा.व.(महिला)	इ.मा.व.(महिला)
७.	श्रीमती पुनम कृष्णा पोळ	अ.जा. (महिला)	अ.जा. (महिला)
८.	श्रीमती संजिवनी देवराव चोपडे	इ.मा.व. (महिला)	इ.मा.व. (महिला)
९.	श्री. विशाल सोपानराव नाबदे	अ.जा.	अ.जा.(महिला)

२. उक्त उमेदवारांची सेवाज्येष्ठता सदरचे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून निश्चित करण्यात यावी.

३. सहायक मोटार वाहन निरिक्षक पदाचे नियुक्ती प्राधिकारी हे परिवहन आयुक्त आहेत. त्यानुसार वरील ९ उमेदवारांना सहायक मोटार वाहन निरिक्षक (गट-क) या संवर्गातील रिक्त असलेल्या पदांवर मागासवर्गीय आरक्षण व समांतर आरक्षणाची पदे विचारात घेऊन शासन सेवेत समावून घेण्याची व त्यांची सेवाजेष्ठता निश्चित करण्याची पुढील कार्यवाही परिवहन आयुक्त यांनी करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०४२२१६३१५७२४२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Arjun Sampat Waghmode

Digitally signed by Arjun Sampat Waghmode
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ffa36f850da37bfbe62486d2bab04146cb40b5662724fae653d0947d157f6450, serialNumber=ae0e4de46520602899a22015dac4a9cedaae6d43ca3fcb9262b2280e43ecfce7, cn=Arjun Sampat Waghmode
Date: 2019.04.24 11:38:52 +05'30'

(अर्जुन सं.वाघमोडे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव
३) परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
४) मा. मंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव
५) मा. राज्यमंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव
६) मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
७) मा. प्रधान सचिव (परिवहन) यांचे स्वीय सहायक
८) मा. उप सचिव (परिवहन) यांचे स्वीय सहायक
९) निवडनस्ती (परि-३)